महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२०९/६३/६९, संकेतस्थळ: http://www.med-edu.in & http://www.dmer.org

क्र.संवैशिवसं/संकीर्ण/eMedica/इलेक्ट्रॉनिक मेडिकल गॅजेट/ ९४३८ /४-अ/२०२१, दिनांक:२४/११/२०२१

कार्यालयीन आदेश

विषय : The innovative Wellness product _ eMedica.

संदर्भ : सीईओ, रोहेरा हेल्थकेअर ॲन्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि, पुणे
यांचे पत्र दिनांक १२/१०/२०२१

प्रस्तुत विषयी संदर्भीय पत्रान्वये सीईओ, रोहेरा हेल्थकेअर ॲन्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि., पुणे यांनी "eMedica" या उत्पादनाचे शासकीय रुग्णालयामध्ये ट्रायल करण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

उक्त प्रस्तावामध्ये पुढील बाबी नमुद करण्यात आल्या आहेत.

१. "eMedica" या उपकरणाची उपयुक्तता

Improves Immunity, Support to reduce Heart blockages, Support to control Diabetes, Support to fight different viral infection, Support to control Hypothyroidism, Improves Blood Circulation, Increase Oxygen saturation, Balance the pH level, Control Cholesterol levels, Control Blood Pressure, Support to control Parkinson's & Paralysis, Prevent Cancer & Metastasis, Support to detox liver and kidney, Support to control Uric acid levels (Gout), Support to reduce lung diseases and Fibrosis of lungs. No side effects, Non invasive, Family device.

२. उक्त उपकरणास अन्न व औषध प्रशासनाची मान्यता मिळण्याकरीता संबंधित कंपनीमार्फत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

३. eMedica या उपकरणास NABL Approved, CE, ROSH, ISO Certified असे विविध नामांकीत प्रमाणपत्रे प्राप्त झाली असल्याचे प्रस्तावात नमुद केले आहे.

रोहेरा हेल्थकेअर ॲन्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि., पुणे यांनी eMedica या इलेक्ट्रॉनिक मेडिकल गॅजेट उपकरणाच्या उपयोगासंदर्भात अधोरेखित केलेल्या उक्त बाबींच्या पडताळणीसह पुढील नमुद मुद्यांबाबत देखिल स्पष्टता होणे आवश्यक आहे.

- सदरचे उपकरण रुग्णोपचाराच्या दृष्टिने उपयुक्त आहे का ? असल्यास प्रचलित उपचार पध्दतीच्या तुलनेत किती प्रमाणात फायदेशिर आहे ?
- शासकीय रुग्णालयात सदर उपकरणाचा वापर करणे शक्य आहे किंवा कसे ?

(कृ.मा.प.)

E:\Misclinics Files\Miscellinious 2021\e Medica_Wellness product.docx

Scanned with CamScanner

यासर्व बाबींचा उहापोह करुन सदर उपकरणाचे आयुर्मान, उपयोग सुलभता इत्यादींच्या परिक्षणात्मक अभ्यासांती अहवाल प्राप्त होणे आवश्यक आहे.

यास्तव eMedica या उत्पादनाचे सर्वांगीन चाचणीअंती अहवाल सादर करण्याकरीता पुढील प्रमाणे तज्ञ समिती गठित करण्यात येत आहे.

१) डॉ. विद्या नगार, प्राध्यापक (तदर्थ), औषधवैद्यकशास्त्र, ग्रॅ.शा.वै.म., मुंबई

२) डॉ. गिता शेठ, सहयोगी प्राध्यापक, नेफ्रोलॉजी, ग्रॅ.शा.वै.म., मुंबई

३) डॉ. तेजल वधान (सुरळकर), सहयोगी प्राध्यापक, कामा व अल्ब्लेस रुग्णालय, मुंबई

उपरोक्त समितीने eMedica या इलेक्टॉनिक मेडिकल गॅजेट उपकरणाचे परिक्षण करुन स्वयंस्पष्ट अहवाल १० दिवसांत संचालनालयास सादर करावा.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

प्रति,

१) डॉ. विद्या नगार,
प्राध्यापक (तदर्थ), औषधवैद्यकशास्त्र, ग्रॅ.शा.वै.म., मुंबई

२) डॉ. गिता शेठ,
सहयोगी प्राध्यापक, नेफ्रोलॉजी, ग्रॅ.शा.वै.म., मुंबई

३) डॉ. तेजल वधान (सुरळकर),
सहयोगी प्राध्यापक, कामा व अल्ब्लेस रुग्णालय, मुंबई

प्रत : सीईओ, रोहेरा हेल्थकेअर ॲन्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि, पुणे

यांना कळविण्यात येते की, eMedica या उपकरणाचे उक्त समितीसमोर सादरीकरण करावे. तसेच तपासणी/प्रात्यक्षिकाकरीता उपकरणी उपलब्ध करुन द्यावे.

प्रत : माहितीस्तव.

१) अधिष्ठाता, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई

२) अधिक्षक, कामा व अल्ब्लेस रुग्णालय, मुंबई



Scanned with CamScanner

# आरोग्य सेवा आयुक्तालय ,

## (महाराष्ट्र राज्य)

आरोग्य भवन, ६वा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय, आवार, पी'डिमेलो रोड, मुंबई ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | Website : http://maha-arogya.gov.in<br>Email : jdhs03@gmail.com |
|---|---|---|
| आयुक्त, आरोग्य सेवा | २२६२ ०२३५ | |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | |
| सहसंचालक (रुग्णालये) | २२६११४७१ | १७५-७९ |


आरोग्य सेवा

क्र.आसेआ/कक्ष-३/टे.३/८५/२१/ई-मिडीका/ /२२

दि.५ जानेवारी, २०२२

प्रति,

मे.स्वतंत्र पॉवर प्रा.लि.,
२०१, मनिष प्लाझा, भाराम मॅजेस्टीक,
एन.आय.बी.एम.रोड,
पुणे ४११ ०४८

विषय - ई-मिडिका बाबत...

संदर्भ - आपले दि.२८.७.२०२१ चे पत्र

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या संदर्भाधीन पत्रान्वये ई-मिडिका या उत्पादनाबाबतचे माहितीपत्रक व इतर कागदपत्रे आयुक्तालयास प्राप्त झालेली आहे. सदरहू पत्रान्वये आपल्या कंपनीने ई-मिडिका हे उपकरण मधुमेह, कॉलेस्ट्रोल, हृदयविकार, इ. आजारांवर अत्यंत उपयुक्त असल्याबाबत कळविले आहे.

तरी आपणांस कळविण्यांत येते की, आपले उपकरण हे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक व अमरावती येथे दोन महिन्याकरीता डेमोकरीता बसविण्यांत यावे. तसेच त्याकरीता आवश्यक असलेले मनुष्यबळ आपल्या स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यांत यावे.

सहसंचालक, आरोग्य सेवा
रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई

(मा.आयुक्त महोदय यांची मान्य टिप्पणी)

प्रत - वैद्यकीय अधिक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय,नाशिक व अमरावती

२/- आपणांस कळविण्यांत येते की, उपरोक्त विषयी ई-मिडिका या उपकरणाचे प्रात्यक्षिक करण्याकरीता सदरहू मशीन आपल्या रुग्णालयामध्ये दोन महिन्याकरीता बसविण्यांत यावे. सदरहू मशीनचा उपयोगिता अहवाल, त्याची किंमत, तसेच रुग्णांना त्याचा होणार फायदा याबाबतचा तज्ञांकडून अहवाल आयुक्तालयास सादर करण्यांत यावा.

प्रत -उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक / अकोला मंडळ, अकोला

Scanned with CamScanner